# फ्लिपकार्टने आपल्या पुरवठासाखळीत २५,००० हून अधिक इलेक्ट्रिक वाहने केली समाविष्ट, २०३० पर्यंत १०० टक्के इलेक्ट्रिक मोबिलिटी मिळवणार

- क्लायमेट ग्रुपच्या ईव्ही१०० उपक्रमात सहभागी झाल्यानंतर आपल्या ताफ्यातील सर्व वाहने इलेक्ट्रिक वाहनांमध्ये बदलण्याच्या बांधिलकीला बळकटी
- हिरो इलेक्ट्रिक, महिंद्रा इलेक्ट्रिक आणि पिआजिओ यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांसोबत भागीदारी करत लॉजिस्टिक भागीदारांच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहने मिळवणार

**बंगळुरू - २४ फेब्रुवारी २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील अंतरदेशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने २०३० पर्यंत २५,००० हून अधिक इलेक्ट्रिक वाहने वापरात आणणार असल्याची घोषणा आज केली आहे. आपल्या शहरी ताफ्यात (लॉजिस्टिक फ्लीट) इलेक्ट्रिक वाहने आणण्याच्या आणि डिलिव्हरी हब्स व कार्यालयांमध्ये चार्जिंग सुविधा उभारून भारतातील इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) वापराला वेग देण्याच्या फ्लिपकार्टच्या सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. देशभरात दिल्ली, बंगळुरु, हैदराबाद, कोलकाता, गुवाहाटी आणि पुणे अशा अनेक शहरांमध्ये फ्लिपकार्टने दुचाकी आणि तिनचाकी इलेक्ट्रिक वाहने वापरण्यास सुरुवात केली आहे.

फ्लिपकार्टच्या इलेक्ट्रिक ताफ्यात भारतात डिझाइन आणि तयार केलेल्या दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी गाड्या असल्याने यातून स्थानिक नावीन्यता आणि अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. फ्लिपकार्टने देशभरातील आपल्या फर्स्ट आणि लास्ट माईल डिलिव्हरी फ्लीटमध्ये विशिष्ट वाहनांचा समावेश करण्यासाठी हिरो इलेक्ट्रिक, महिंद्रा इलेक्ट्रिक आणि पिआजिओ यांसारख्या काही आघाडीच्या इलेक्ट्रिक वाहन उत्पादकांसोबत भागीदारी केली आहे.

फ्लिपकार्टतर्फे सेवाकरार केले जातील, त्यांच्या पुरवठा साखळी केंद्रांमध्ये सुमारे १४०० चार्जिंग सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, जागरुकता उपक्रम राबवले जातील आणि डिलिव्हरी एग्झिक्युटीव्हजना ईव्ही वापरण्यासाठी प्रोत्साहनही दिले जाईल.

**फ्लिपकार्टच्या ईकार्ट आणि मार्केटप्लेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष (एसव्हीपी) अमितेश झा** म्हणाले, “इलेक्ट्रिक मोबिलिटीचा फायदा परिसंस्थेतील अनेक भागधारकांना होऊ शकतो. यात फक्त ई-कॉमर्सच नाही, तर इतर अनेक क्षेत्रांचा समावेश आहे. लॉजिस्टिक फ्लीटचे इलेक्ट्रिफिकेशन हा फ्लिपकार्टच्या व्यापक शाश्वतता ध्येयाचा भाग असून क्लायमेट ग्रुपच्या ईव्ही१०० उपक्रमांसंदर्भातील त्यांच्या बांधिलकीला अनुसरून आहे. २०३० पर्यंत आमची लॉजिस्टिक फ्लीट संपूर्णपणे इलेक्ट्रिक करण्याच्या या प्रवासात इलेक्ट्रिक वाहने पुरवण्यासाठी आम्ही आघाडीच्या कंपन्यांसोबत सहकार्य आणि काम करणार आहोत. त्याचवेळी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकासही साधणार आहोत. व्यवसायातील आणि शाश्वता ध्येये गाठण्यासाठी इलेक्ट्रिक दळणवळणाचे महत्त्व आम्ही जाणतो आणि देशभरात ईव्हीचा मोठ्या प्रमाणावर वापर व्हावा, यासाठी नवे मार्ग खुले करण्यास आम्ही बांधिल आहोत."

फ्लिपकार्ट वातावरणीय शाश्वततेला बांधिल आहे आणि नैसर्गिक स्रोतांचा कमाल वापर करत आपला व्यवसाय जबाबदारीने करण्याचा सर्वांगीण आणि सक्रिय दृष्टिकोन त्यांनी अंगिकारला आहे. या दिशेने कूच करताना मागील वर्षभरात फ्लिपकार्टने चार्जिंग सुविधा देऊ करणारे, कौशल्य विकास एजन्सी, अ‍ॅग्रीगेटर्स आणि ओईएम (ओरिजनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स) अशा भागीदारांसोबत परिसंस्थेचे भक्कम जाळे विणण्यास सुरुवात केली आहे.

**फ्लिपकार्टच्या लॉजिस्टिक फ्लीटमधील इलेक्ट्रिक वाहनांची माहिती**

**हिरो इलेक्ट्रिकची Nyx सीरिज :** भारतातील सर्वात मोठ्या इलेक्ट्रिक टू-व्हीलर कंपनीची Nyx सीरिज (HX आणि LX या दोन्ही प्रकारांतील) अत्यंत दमदार, विश्वासार्ह, टिकाऊ आहे आणि यातून अतिरिक्त शक्तीसह एका चार्जमध्ये १५० किमीपर्यंतचा प्रवास अशा सोयीही मिळतात. लास्ट-माइल डिलिव्हरीज आणि इतर व्यावसायिक वापरासाठी सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या स्कूटर्समध्ये यांचा समावेश होतो. भारतात कोलकाता, गुवाहाटी आणि भुवनेश्वर अशा अनेक शहरांमध्ये फ्लिपकार्टच्या लॉजिस्टिक डीप्लॉयमेंट भागीदारांच्या माध्यमांतून ही वाहने वापरण्यास सुरुवात झाली असून त्यातून हजारो डिलिव्हरीज केल्या जात आहे. **हिरो इलेक्ट्रिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सोहिंदर गिल** म्हणाले, “हिरो इलेक्ट्रिक आपल्या 'नो एमिशन' या मोहिमेला बांधिल आहे आणि मागील काही महिन्यांत आम्ही लास्ट माईल डिलिव्हरीमध्ये आयसीई (इंटर्नल कंबशन इंजिन्स) ते इलेक्ट्रिक वाहन असा बदल करण्यात यशस्वी ठरलो आहोत. फ्लिपकार्टसोबतची भागीदारी फार महत्त्वाची आहे आणि यामुळे त्यांच्या फ्लीटमधील लक्षणीय प्रमाणातील वाहने ईव्हीमध्ये बदलण्यात साहय होईल आणि त्यातून ई-कॉमर्स क्षेत्राला इलेक्ट्रिक वाहनांचा सक्रियपणे अवलंब करण्यास चालना मिळेल."

**महिंद्रा इलेक्ट्रिकची ट्रीओ झोर :** इलेक्ट्रिक तिचाकीची रचना आणि निर्मिती भारतातच आधुनिक लिथिअम-इऑन बॅटरी आणि इतर पर्यायांसह करण्यात आल्याने परिणामकारक फ्लीट व्यवस्थापनात यामुळे साहय होईल. डिझेल आणि इतर इलेक्ट्रिक कार्गो तिचाकींसोबत तुलना केल्यास ट्रीओ झोरमध्ये अनोखे ग्राहक मूल्य आणि या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट ८ किलोवॅटची ताकद, या वर्गातील सर्वोत्कृष्ट ४२ एनएमचा टॉर्क, सर्वोच्च ५५० किलोचा पेलोड, कमाल रेंज आणि या क्षेत्रातील सर्वात मोठा व्हीलबेस आहे. त्यामुळे या वर्गातील ही सर्वात स्थिर आणि सुरक्षित तिचाकी ठरते. **महिंद्रा इलेक्ट्रिक मोबिलिटीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी महेश बाबू** म्हणाले, "फ्लिपकार्टने अत्यंत वेगाने आपल्या फ्लीटमध्ये ईव्हीचा अवलंब केला हे पाहून आम्हाला आनंद झाला. देशाला आमच्या ट्रिओ झोरच्या माध्यमातून स्वच्छ, शाश्वत आणि परवडणाऱ्या दरातील लास्ट-माइल डिलिव्हरी पर्याय देण्यास आम्ही एकत्रितरित्या बांधिल आहोत."

**पिआजिओची एपे ई एक्स्ट्रा :** ही इलेक्ट्रिक तिचाकी या वर्गातील सर्वात दमदार वाहन म्हणून आधुनिक बॅटरी तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट ग्राहकानुभवानुसार तयार करण्यात आली आहे. याप्रसंगी **पिआजीओ व्हेइकल्स प्रा. लि.चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. डिएगो ग्राफी** म्हणाले, "एपे हा ३० लाखांहून आनंदी ग्राहकांचा विश्वासार्ह ब्रँड आपल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या एफएक्स रेंजसह भारतात इलेक्ट्रिक क्रांती आणू पाहत आहे. मागील

दीड दशकापासून इलेक्ट्रिक तंत्रज्ञान विकसित करण्याचा पिआजिओ ग्रुपचा संपन्न वारसा आहे आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी आणण्याच्या फ्लिपकार्टच्या या प्रवासात त्यांची साथ देताना आम्हाला आनंद होत आहे."

आपल्या मूल्यसाखळीत शाश्वत व्यवसाय पद्धती अंगिकारण्याच्या फ्लिपकार्टच्या बांधिलकीचा भाग म्हणून कंपनीने गेल्या काही वर्षांत विविध उपक्रम राबवले आहेत. पुरवठा साखळीत सिंगल-युज प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर कमी करण्याचाही यात समावेश आहे. फ्लिपकार्टचे कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा सक्षम पद्धती, शाश्वत ऊर्जेचा वाढता वापर आणि नुकतेच मिळवलेले आयएसओ १४००१ प्रमाणन यातून त्यांचे शाश्वत पद्धतींसाठीचे सातत्यपूर्ण प्रयत्न अधोरेखित होतात.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratise e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**